# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू ) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

**क्र. :-सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-६०४/२०१०**
**दिनांक :-** ३१ **/१२/२०१०**

**वाचले :-** १) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/कार्या-२/वने/कावि-११८८/२०१० दि. ०२/११/२०१०

**आदेश :-**

ज्याअर्थी मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. ३२४६/२००४ व जनहित याचिका क्र. ८७/२००६ मधील दि. २७/०१/२०१० रोजीच्या निर्णयाचेअनुषंगाने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने शासनाच्या विविध यंत्रणामार्फत करावयाची कार्यवाही व प्रस्तावित कार्यवाही याबाबत शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यानुसार विहीत कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण होणे आवश्यक असल्याने याबाबत जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी उक्त पत्रान्वये दिलेले आहेत.

त्याअर्थी मुंबई उपनगर जिल्हयाचे कार्यक्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा समिती स्थापन करण्यात येत आहे. समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्याची याद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव व पदनाम | जिल्हा समितीमधील पद | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा | अध्यक्ष | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, बांद्रा, मुंबई-५१ |
| २ | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा | सदस्य सचिव | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, बांद्रा, मुंबई-५१ |
| ३ | मुख्य वनसंरक्षक | सदस्य | मुख्य वनसंरक्षक (वन विभाग) एल बी शास्त्री मार्ग, मॅरेथॉन सर्कल, नवपाडा, ठाणे-४०० ६०२. |
| ४ | उपायुक्त पोलीस झोन क्र. १२ | सदस्य | पोलीस विभाग, पोलीस उपायुक्त यांचे कार्यालय, दहिसर (पूर्व) |
| ५ | उपसंचालक, म.प्र.नि.मं., | सदस्य | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| ६ | श्री. डेबी गोयंका | सदस्य | बॉम्बे एन्व्हार्यमेंटल ॲक्शन ग्रुप, ६-ई-१, कोर्ट चेंबर, ३५, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०. |

UNDER CERTIFICATE OF POSTING

जिल्हयातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने तालुका समितीने केलेल्या कार्यवाहीचा आढावा जिल्हा समिती दरमाह घेईल आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमाह महिना अखेरीस दि. ३० किंवा ३१ तारखेपर्यंत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे सादर करील.

**(निर्मल देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**मुंबई उपनगर जिल्हा**